| | |
|---|---|
| MHSN110001222011 | नियमित दिवाणी दावा क्र.२८/२०११<br>सचिन साळुंखे / निवृत्ती साळुंखे |

**निशाणी ११७ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांच्या तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ व आदेश १ नियम १० नुसार देण्यात आलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, दावा वाटपासाठी दाखल करण्यात आला आहे. दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र.१अ ते १इ तसेच प्रतिवादी क्र.२अ ते २ड व प्रतिवादी क्र.११ यांनी मिळून दावा मिळकत गट नं.१०५१ मधील ४ हेक्टर ८० आर ही मिळकत अशोक दत्तात्रय पवार यांना विक्री केल्यानंतर सदर दत्तात्रय यांनी सुरज लालासो मोरे, साहिल दत्तात्रय मोरे, सौरभ दत्तात्रय मोरे यांच्या नावे दिनांक १८/१०/२०२२ रोजी खरेदीदस्त नं.१८६६/२०२२ नुसार पोकळ बनावटरित्या बेकायदेशीरपणे तबदील केलेली आहे. वादी यांनी दावा मिळकतीचा ७/१२ उतारा काढून पाहिला असता त्यांना सदर प्रकार कळाला आहे. त्यामुळे वादी यांनी त्या अनुषंगाने दुरुस्ती मागून उपरोक्त लोकांना दाव्यात पक्षकार करण्याची विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

३. या अर्जाला प्रतिवादी यांनी म्हणणे देवून संपूर्ण अर्जाचे खंडण केलेले आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. अर्जासोबत कोणताही पुरावा दिलेला नाही. अर्ज मुदतीत नाही. केवळ वेळकाढूपणा करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज देण्यात आलेला आहे. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी

केली आहे.

४. दाव्याचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला. दावा वाटपासाठी दाखल करण्यात आलेला आहे. मिळकतीबाबत झालेल्या घडामोडी या दावा दाखल झाल्यानंतर हल्लीच्या काळात झालेल्या आहेत असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्तीनुसार वादी काही नवीन तथ्ये मांडत आहेत असे दिसून येते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे झालेल्या बदलात प्रतिवादी यांना जादा कैफियत देवून बचाव मांडता येणार आहे. त्यामुळे, अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करतो.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने दाव्यामध्ये १४ दिवसांच्या आत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत द्यावी अन्यथा योग्य ते आदेश करण्यात येतील.

३. सहा. अधीक्षक यांनी दावा रजिष्टरमध्ये दुरुस्तीची नोंद घ्यावी.

Sd/-xx

(वि. द. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
आटपाडी

आटपाडी.
दिनांक : ०२/०१/२०२४

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 02/01/2024 |
| Order signed by the Presiding Officer | : | 02/01/2024 |
| Order uploaded on | : | 02/01/2024 |